महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगासाठी
सहाय्यक अनुदान वितरीत करणेबाबत
वित्तीय वर्ष २०१८-१९

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र. निधीवि-२०१८/प्र.क्र.७०(१)/ऊर्जा-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :-२० मार्च, २०१९

<u>संदर्भ</u> :- १) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. निधिवि-२०१८/प्र.क्र.७०/ऊर्जा-३, दि. २४.०९.२०१८
२) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. अर्थसं- २०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२/०४/२०१८
३) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.६९ /अर्थ-३, दि. २५.०१.२०१९

<u>प्रस्तावना</u> :-

सन २०१८-१९ या वित्तीय वर्षासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगासाठी मूळ अर्थसंकल्पिय तरतूद रु.१.०० लाख मंजूर होती. त्याअनुषंगाने वित्त विभागाच्या संदर्भिय परिपत्रक २ अन्वये ७०% च्या मर्यादेत रु. ७०,००० इतका निधी संदर्भिय शासन निर्णय क्र. १ अन्वये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास वितरीत करण्यात आला आहे. परंतु सुधारीत अंदाजात मागणी क्र. के-६, मुख्य लेखाशिर्ष २८०१२४६४ अंतर्गत ८०,००० इतका निधी मंजूर झाला आहे. संदर्भिय शासन निर्णय क्र. १ अन्वये वितरीत करण्यात आलेली तरतूद रु. ७०,००० वजा जाता शिल्लक तरतूद रु. १०,०००/- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचे कार्यालयीन भाडे, आकस्मिक खर्च इत्यादि अनुषंगिक खर्च भागविण्यासाठी रु.१०,०००/-(रुपये दहा हजार फक्त) रोखीने वितरीत करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

२. या निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाची रक्कम ज्या कारणासाठी मंजूर करण्यात आलेली आहे त्याच कारणासाठी उपयोगात आणली जाईल याची खातरजमा करावी.

३. याप्रित्यर्थ होणारा खर्च "मागणी क्र. के-०६, २८०१ वीज, ०५ पारेषण व वितरण, ८०० इतर खर्च,(००)(००)(०५) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कार्यक्रम) (२८०१२४६४) ३१ सहाय्यक अनुदान(वेतनेत्तर)" या लेखाशिर्षा खाली खर्ची टाकावा व तो सन २०१८-१९ या वर्षासाठी मंजूर झालेल्या सुधारीत अंदाजाच्या रु. ८०,००० मधून भागविण्यात यावा. तसेच या लेखाशिर्षाखाली निधी वितरीत करण्यासाठी सादर करण्यात आलेल्या देयकाच्या अनुषंगाने प्रमाणित करण्यात येते की या लेखाशिर्षाखाली कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबीत नाही तसेच उपयोगिता प्रमाणपत्र प्रलंबित नाही. सदर देयकाची रक्कम धरून या लेखाशिर्षाखाली रक्कम सुधारीत अंदाजाच्या मर्यादेत आहे.

४. सदर रक्कम आहरीत करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून अवर सचिव (ऊर्जा-३) व नियंत्रण अधिकारी म्हणून सह सचिव (ऊर्जा-३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२ यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग, मुंबई यांना मंजूर झालेली रक्कम रु.१०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई येथून महाराष्ट्र

विद्युत नियामक आयोग यांच्या नांवे स्वतंत्ररित्या धनादेश काढून वितरित करण्याची कार्यवाही करावी.या निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाची रक्कम ज्या कारणासाठी मंजूर करण्यात आलेली आहे त्याच कारणासाठी उपयोगात आणली जाईल याची खातरजमा करावी.

शासन परिपत्रक वित्त विभाग, दिनांक २ एप्रिल, २०१८ मध्ये परिच्छेद ७ मधील अट क्रमांक १ ची पूर्तता होत असून अट क्र. २ ते ९ सदर प्रकरणी लागू होत नाहीत. तसेच सोबतच्या परिशिष्टातील एकूण अट क्र. १ ते ८ मधील अट क्रं.१ ते ७ लागू होत नाहीत. अट क्र.८ मधील ३१ वेतनेत्तर सहायक अनुदाने तपासणी सूचीतील अट क्र. १ ते १० पैकी अट क्र. १ ते ३ ची पूर्तता होत असून अट क्र. ४ ते १० लागू ठरत नाही. तथापि, वित्त विभागाने मंजूर केलेल्या सुधारीत अंदाजाच्या मर्यादेत निधी वितरणाचे अधिकार प्रशासकीय विभागास देण्यात आले आहे. सदर अधिकारात महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास रू. १०,०००/- (रू. दहा हजार फक्त) इतकी तरतूद वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं- २०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २५/०१/२०१९ अन्वये ८०% च्या मर्यादेत मंत्रालयीन विभागाना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारात प्रधान सचिव (ऊर्जा) यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१९०३२०१२५७४१०२१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Nitin Gaikwad

Digitally signed by Nitin Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5892c3fd8686c1921e784a3faa9888d155b03f5591ce11b21a1b5006247f6972, serialNumber=2276ac762af372d872c2f01d5bb5086166f4a6e20a1bdf9762d556a93f5d118e, cn=Nitin Gaikwad
Date: 2019.03.20 13:09:27 +05'30'

(नितिन गायकवाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) सचिव महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, वर्ल्ड ट्रेड सेंटर नं.१, १३ वा मजला, कफ परेड, कुलाबा, मुंबई-०५
२) मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद / विधानसभा, विधान भवन, मुंबई
३) महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई-४०००२०.
४) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई-४०००२०.
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
६) अधिदान व लेखा अधिकारी, अराप /रालेवि-१), मुंबई.
७) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
८) निवासी लेखा अधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.
९) कक्ष अधिकारी (रोख), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई -४०००३२.
१०) कक्ष अधिकारी वित्त विभाग, (अर्थसंकल्प-१४ / साधनसंपत्ती / साऊ / व्यय-१६) मंत्रालय, मुंबई ३२
११) निवडनस्ती (ऊर्जा-३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.